# सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचा व्यवसाय समाधान कारकतेचा अभ्यास करणे

## विद्यापीठ अनुदान आयोग

(पश्चिम विभागीय ऑफिस)


**संशोधक**

**प्रा. वाघमोडे अरविंद पांडूरंग**

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज



शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज,

अकलूज - ४१३१०१ ता.माळशिरस जि.सोलापूर, महाराष्ट्र

**२०१५**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | I |
| | खर्च तपशील | II |
| | सी.ए. प्रमाणपत्र | III |
| | | |
| | | |
| १.१ | प्रास्ताविक | २ |
| १.२ | संशोधनाची गरज | ४ |
| १.३ | संशोधनचे शीर्षक | ६ |
| १.४ | संशोधनची उद्दिष्टे | ६ |
| १.५ | संशोधनायी व्याप्ती व मर्यादा | ६ |
| १.६ | संबंधित साहित्याचे व संशोधनाचे समीक्षण | ७ |
| १.७ | संशोधनाच्या पद्धती व साधने निवड | १५ |
| १.८ | संशोधनाचे अर्थनिवर्चन | १९ |
| | **संदर्भग्रंथ सूची** | **२५ ते ३२** |
| | **परिशिष्टे चाचणी** | **३३ ते ३४** |
| १ | चाचणी भरून देण्यासाठी शिक्षकांना दिलेले विनंती पत्र | **३५** |
| २ | चाचणी भरून घेण्यासाठी प्राचार्यांना दिलेले विनंती पत्र | **३६** |
| ३ | महाविद्यालयाची यादी | **३७** |
| ४ | प्रतिसादक शिक्षकांची यादी [गुणासहित] | **परिशिष्ट इ** |

## "सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचे व्यवसाय समाधानकारकतेचा अभ्यास करणे"

### १.१. प्रास्ताविक :

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा तेथील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. आज देशाचा, जगाचा विकास होण्यासाठी शिक्षण ही प्रत्येक मुलाची मूलभूत गरज आहे. देशात प्राथमिक शिक्षण सर्वत्र व मोफत दिले जाते.

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक, विद्यार्थी व आशय हे तीन घटक महत्वाचे आहेत. त्यापैकी शिक्षक हा फारच महत्वाचा घटक आहे. शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता ही शिक्षकावरच अवलंबून असते.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) पुरस्कृत केलेली शारीरिक शिक्षण महाविद्यालये देशातील विविध विद्यापीठातून कार्यरत आहेत महाविद्यालयाचा शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याता होण्यासाठी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी (एम.ए.,एम.कॉम.,एम.एस्सी) घेऊन दोन वर्षाचा शारीरिक शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.पी.एड्) हा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. या दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत अधिव्याख्याता व शारीरिक संचालक होण्यासाठी लागणाऱ्या सर्व बाबींचे व खेळाचे ज्ञान, तंत्र, युक्त्या, कुल्प्त्या, आचारसंहिता यांचे प्रशिक्षण दिले जाते.

शिक्षकी पेशा हा एकदा व्यवसाय म्हणून निवडला की त्या व्यवसायात सुखी, समाधानी व्हावयाचे असेल तर आपल्याला कोणत्या प्रतीचा शिक्षक व्हावयाचे याचा निर्णय घ्यावा लागतो. शिक्षक म्हणून काम करीत असताना आपल्या ज्ञानात, क्षमतेत सतत वाढ करावी लागते. समाजाच्या गरजा जशा बदलतील तसे शिक्षकाला बदलावे लागते. याची जाणीव सदैव ठेवावी लागते. तरच परिणामकारक अध्यापन व चांगले खेळाडू घडवू शकतो.

कोणतेही काम करताना आपण सुखी, समाधानी व आनंदी असलो तर कामही तितकेच चांगले होते. पुढे काय केले पाहिजे याबद्दल सतत प्रयत्नशील राहतो. शिक्षकाचे अध्यापन चांगले झाले की, त्यांना समाधान नसले तर आपोआपच कामाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे परिणामकारकता कमी होते. म्हणजेच शिक्षकाच्या व्यवसाय समाधानाचा परिणाम त्याच्या कामावर होतो.

बेकारीच्या बेसुमार वाढीमुळे नोकरी मिळणे कठीण होत चालले आहे. तुलनेने शिक्षक होणे सोपे वाटत असल्याने वेतन चांगले असल्याने शिक्षकी व्यवसाय स्विकारण्यास उत्सुक असणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. अनेकजण गुणवत्ता नसताना शारिरीक क्षमता नसताना शारिरीक शिक्षण संचालक अथवा अधिव्याख्याता होत आहेत असे चित्र दिसते. हवी ती नोकरी न मिळाल्याने या व्यवसायात असणारे लोक समाधानी असतीलच असे नाही. आपल्याला व्यवसायात सुखी समाधानी व्हायचे असेल तर केवळ अध्यापन पद्वीवर न थांबता स्वत:ची अध्यापन क्षमता वाढवावी लागेल. स्वत:चे काम उत्साहाने करावे लागेल. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव द्यावा लागेल. सहकाऱ्यांशी असणारे मतभेद बाजुला सारून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्न व धडपडीतून खरा मानसिक आनंद मिळणार आहे.

महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याता अनेक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम असला पाहिजे. तसेच तो व्यवसायातही समाधानी असला पाहिजे. जर शिक्षक समाधानी नसेल तर त्याचा परिणाम अध्यापनावर व खेळावर होईल. पर्यायाने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर व खेळावरती होईल.

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जीवनात कोणता ना कोणता तरी उद्योग अगर व्यवसाय करावाच लागतो. उद्योग किंवा व्यवसाय करून उदरनिर्वाह करावयाचा असतो. हा व्यवसाय साधारणपणे ३० ते ४० वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी करावयाचा असतो. निवडलेला व्यवसायात प्रत्येक व्यक्तीस आनंदाने आणि समाधानाने करता येणे सर्वांच्याच फायद्याचे असते. या दृष्टिने त्या व्यवसायाविषयी त्या व्यक्तीची आवड महत्वाची ठरते. तसेच त्या व्यवसायाकडे त्या व्यक्तीचा कल आहे किंवा नाही यावरही व्यावसायिक समाधान अवलंबून असते.

शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याता पेशा स्वीकारताना विद्यार्थ्यांबद्दल मनात कमालीची आत्मियता असेल आणि अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता असेल तर त्यामुळे शिक्षकी पेशांत संबंधित व्यक्तीस समाधान मिळू शकते. शिक्षकाच्या मनात अध्यापनाची व खेळाची आवड असावी लागते. अध्ययनार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण सहानुभूतिपूर्ण असावयास हवा. वर्गध्यापन मनापासून करणारा शिक्षक त्याचे अध्ययनार्थी तर घडवितोच पण त्याबरोबर आत्मिक समाधानही प्राप्त करून घेतो. व्यवसायापासून त्याला जर आनंद मिळाला तर त्याचा परिणाम त्याच्या कार्यक्षमतेवर व कामाच्या दर्जावर तर होतो पण त्याचबरोबर त्याच्या

मनस्वास्थ्यावरही होतो. आनंदाने व समाधानाने कार्य करणाऱ्या व्यक्तीला श्रमाची जाणीव होत नाही. कारण तो व्यवसाय त्याच्या आवडीचा असतो.

शिक्षकाचा संबंध तर चालत्याबोलत्या जीवनाशी असतो. भावी काळातील नवीन समाज घडविण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. अध्ययन-अध्यापनातून कितीतरी छोटेमोठे संस्कार शिक्षक अध्ययनार्थ्यांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे करीत असतो. अध्ययनार्थ्यांत विविध विषयांसबंधी अभिरूची निर्माण करून त्या विषयाचे अध्ययन स्वतंत्रपणे करण्याची क्षमता तो निर्माण करीत असतो. यासाठी अध्ययन प्रभावी होणे महत्वाचे असते. हे कार्य वर्षानुवर्षे करावयाचे असल्यामुळे ते आनंदमय होणे आवश्यक ठरते. व्यवसायिक समाधान प्राप्त करून घेणारा शिक्षक प्रदीर्घ काळ चांगले आयुष्य जगू शकतो. त्याच्या व्यवसायात नैसर्गिकता व सहजता असल्यामुळे श्रमाची जाणीव त्याला कमी प्रमाणात होते.

आपण करीत असलेल्या कार्यातून जे चांगले घडणार आहे त्याबद्दलचा विश्वासही शिक्षकाच्या ठायी असला पाहिजे. अध्यापनाची आवड असणारा शिक्षक अध्ययनार्थ्यांसमोर जाण्यास उत्सुक असेल. अध्ययनार्थ्यांमध्ये तो एकरूप होऊन जाईल. अध्ययन-अध्यापनाविषयी कंटाळा त्याच्या मनाला स्पर्श करणार नाही. तो व्यवसायिक कौशल्ये आत्मसात करून नवनवीन अध्यापन पद्धतीच्या मदतीने आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणेल. थोडक्यात, अध्गापनाचे कार्य चांगले व्हायचे असेल तर आपण करत असलेल्या कार्यासंबंधी समाधान असणे आवश्यक आहे. आपल्या व्यवसायात समाधानी शिक्षकच भरीव स्वरूपाचे कार्य करून समाज परिवर्तन घडवून आणू शकेल.

म्हणूनच महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते व्यवसायात समाधानी आहेत का? हे पाहण्यासाठी संशोधकाने हे संशोधन करण्याचे ठरविले आहे.

## १.२ संशोधनाची गरज :

संशोधक वरीष्ठ महाविद्यालयात गेली सोळा वर्षापासून शारीरिक शिक्षण संचालक व अधव्याख्याता म्हणून काम करीत आहे. महाविद्यालयात काम करीत असताना दररोज विविध विद्यार्थी शिक्षकांशी निकटचा संबंध आला. तसेच औपचारिक गप्पागोष्टीतून शिक्षकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. काही शिक्षकांना या शिक्षकी पेशाची आवड आहे म्हणून या व्यवसायात आले

आहेत. काहीजण पेशाचे आकर्षण, समाजात मिळणारा मान, काम कमी पगार जास्त, सुट्यांचे प्रमाण भरपूर, लांब सुट्टी मिळते यामुळे या पेशात आलेले आहेत. काही शिक्षकांचे विचार खूपच उच्च व चांगले आहेत. ज्ञानदाना सारखा पवित्र पेशा नाही. ते अगदी हाडाचे शिक्षक म्हणूनच काम करतात. शिक्षकांशी हितगुज व चर्चा करीत असताना काही शिक्षक काम करायचे म्हणून करायचे असेही दिसून आले. पण समाजात चांगल्या शिक्षकांची कमतरता मात्र दिसून आली. प्रत्येक

आजच्या शिक्षकाकडून समाजाच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. या सर्व अपेक्षा पूर्ण होणे कठीण वाटते, पण शिक्षक या अपेक्षा पूर्ण करण्याचा किमान प्रयत्न तरी करतात का? आज सर्व समाज भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला दिसतो. त्याला शिक्षकही अपवाद नाही. समाजात वावरत असताना शिक्षकाला स्वछंदी जीवन हवे असते. समाजाची बंधने शिक्षकाला नको असतात. शिक्षकाच्या व्यवस्थापन व प्रशासन यांच्याकडून वेळेवर समस्या सोडविल्या जात नाहीत. त्यामुळे शिक्षक समाधानी असेलच असे नाही.

शिक्षक वर्गामध्ये, महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबवित असतो. अशा उपक्रमांची दखल शाळा व्यवस्थापनाकडून किंवा प्रशासनाकडून घेऊन त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक असते. पण अशी दखल संबंधिताकडून घेतली जातेच असे नाही. शिक्षण क्षेत्रातील होणाऱ्या नवनवीन बदलांची नोंद घ्यावी लागते. शिक्षकाला आपली व्यावसायिक पात्रता वाढविणे गरजेचे असते. तसेच त्यांच्या बौद्धिक उन्नतीसाठी महत्वाचे असते पण व्यवस्थापन व प्रशासनाकडून परवानगी मिळतेच असे नाही.

आपण संगणक युगात वावरत आहोत पण विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी प्रशस्त इमारत, स्वत:चे क्रिडांगण, शैक्षणिक साधने व इतर भैतिक सुविधा या सर्व गोष्टींची कमतरता आजही जाणवते. या सर्व साधन सुविधा उपलब्ध करून देण्याची काळजी घेतली जात नाही.

जर शिक्षक व्यवसायात समाधानी नसेल तर कितपत परिणामकारक अध्यापन करू शकेल. आजच्या स्पर्धेच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकाचे काम कठीण होत चाललेले दिसू येते.

त्यामुळे व्यवसायात येणाऱ्या अनेक समस्यांना तो समर्थपणे तोंड देऊ शकेल काय? तसेच या धावपळीच्या काळात काम करण्यास शिक्षक सक्षम आहे का? हे पाहणे गरजेचे आहे.

जर शिक्षक समाधानी नसेल तर येणाऱ्या आव्हांनांना समर्थपणे तोंड देऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाबाबत अभिरूची निर्माण करणे, बौद्धिक चालना देणे, येणाऱ्या समस्यांना तोंड देण्यास प्रवृत्त करणे त्याला शक्य होणार नाही. म्हणून ही समस्या निवडली आहे.

## १.३ संशोधन शीर्षक :

"सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचे व्यवसाय समाधानकारकतेचा अभ्यास करणे"

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :

१. शारिरीक शिक्षण संचालक व शारिरीक शिक्षक अध्यापनात समाधानी आहेत का याचा अभ्यास करणे.

२. शारिरीक शिक्षण संचालक व शारिरीक शिक्षकांची (अनुभवी व अल्प अनुभवी) व्यवसाय समाधानकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. व्यवसायाची आवड असणाऱ्या अध्यापकांचा शोध घेणे.

४. आवड नसताना गरजेपोटी व्यवसाय करणाऱ्यांचा शोध घेणे.

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधक आपल्या संशोधनात सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचा समावेश करणार आहे. सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचा व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणार आहे.

संशोधकाने आपल्या संशोधनात सोलापूर विद्यापीठातील सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचा समावेश करण्याचे ठरविले

आहे. संशोधकाने आपल्या संशोधनात सर्व मराठी माध्यमांच्या महाविद्यालयाचा समावेश करण्याचे ठरविले आहे.

शिक्षकांच्या व्यवसाय समाधानात कामाचे स्वरूप, पगार, स्थैर्य, बढतीच्या संधी, संस्थेचे नियोजन व धोरणाविषयीचे समाधान, काम करण्याविषयीचे स्वातंत्र्य व अधिकार या विषयीचे समाधान यांचा विचार करणार आहे.

**संशोधनाच्या मर्यादा :**

* सोलापूर विद्यापीठातील एकूण ११३ महाविद्यालयापैकी ५० महाविद्यालये.
* सोलापूर विद्यापीठातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालये.
* सोलापूर विद्यापीठापुरते मर्यादित.
* सोलापूर विद्यापीठातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये.
* दोन वर्षाच्या अभ्यासक्रमापुरते मर्यादीत.

**१.६ संबंधित साहित्याचे व संशोधनाचे समीक्षण :**

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यानंतर तो नेमक्या व अचुक शब्दात लिहता येण्यासाठी विषयासंबंधीचे ज्ञान व माहिती संशोधकास असावी लागते.

संशोधन समस्येची माहिती अहवाल, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, विश्वकोष यातून मिळवावी लागते. संबंधीत साहित्याचा अभ्यास म्हणजे संशोधन विषयाच्या संदर्भात जे ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे तसेच उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीत अर्थ स्पष्ट करण्यासाठी व संशोधनाचा पाया भक्कम करण्यासाठी संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

शिक्षकाला आपल्या व्यावसायासंबंधीची गुणवैशिष्टे असावी लागतात ते खालील प्रमाणे सांगता येतील.

१. **उत्पादन सेवेचा व्यवसाय :**

शाळा विद्यालय व महाविद्यालयात आपण जे शिक्षण घेतो ते प्राप्त होण्यासाठी आपल्याला शिक्षक अध्यापनाचे कार्य करतात. त्यांनी व्यवसायातील विशिष्ट तंत्रे व कौशल्ये अवगत, आत्मसात केलेली असतात. त्यामुळे या सर्वाचे कार्य उत्पादक सेवा या सदरात मोडते. थोडक्यात शिक्षकाचे कार्य म्हणजे सेवा विषयक उत्पादक होय.

२. **वैयक्तिक व सामाजिक विकासाचा पाया घालणारा व्यवसाय :**

महाविद्यालयात येणाऱ्या मुलांचे भावी जीवन सुखासमाधानात जगता यावे, त्यासाठी त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास करणारा व्यवसाय म्हणून या व्यवसायाकडे पहावे. आज शाळेत शिकत असलेली मुले उद्याचे भावी नागरिक म्हणून समाजात वावरणार आहेत. अनेक सामाजिक मुल्यांची जोपासना करणारा व्यवसाय असल्याने सामाजिक विकासाचा पाया घातला जातो.

३. **संस्कारक्षम, जिवंत, मनाशी संबंध असणारा व्यवसाय :**

सुतार, लोहार, कुंभार यांच्यापेक्षा शिक्षक व्यवसाय वेगळा आहे. शिक्षक व्यवसाय हा माणूस घडविणारा व्यवसाय आहे. हा माणूस संस्कारक्षम, निष्पाप अशा मुलातून घडवायचा आहे. मुलांवर योग्य संस्कार घडविण्याचे व त्यांच्या मनात विवेक जागृत करण्याचे कार्य शिक्षकाला करावे लागते.

४. **सामाजिक परिवर्तन घडवून आणणारा व्यवसाय :**

भारतीय समाज हा प्रतिगामी, परंपरावादी, अंधश्रध्दा, विषमता दारिद्रय यांनी ग्रासलेला आहे. ही दुरावस्था दूर करण्यासाठी दर्जेदार शिक्षणाची आवश्यकता आहे. ही आवश्यकता शिक्षकाच्या व्यवसायाद्वारे पूर्ण होण्यास मदत होते.

५. **शिक्षकांचा व्यवसाय एक सेवाव्रत :**

शिक्षक हा विद्यार्थीपरायण असावा, विद्यार्थी हा ज्ञानपरायण असावा व दोघेही ज्ञानपरायण व ज्ञानसेवापरायण असावेत. शिक्षकाचा व्यवसाय हा अर्थोत्पादनाचा व्यवसाय नसून ते एक सेवाव्रत आहे याचा कधी विसर पडता कामा नये.

६. **अद्ययावतता व नवीनता :**

ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे ज्ञानाच्या कक्षा रोज रूंदावत आहेत. शिक्षकांना आपल्या विषयाचे ज्ञान अद्ययावत ठेवावे लागते. त्यासाठी नवनवीन ज्ञान मिळविण्याची ज्ञाननिष्ठा व लालसा शिक्षकांत असावी लागते.

**७. तंत्रज्ञ, कलावंत, बुद्धिवंताचे निर्मितीचे केंद्र :**

आधुनिक भारताच्या निर्मिती व प्रगतीसाठी शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, कलावंत, बुद्धिवंत यांची आवश्यकता असते. या सर्वाच्या निर्मितीचे केंद्र म्हणून या व्यवसायाकडे पहावयास हवे. [स्नेहा जोशी, १९९४, पृ.क्रं. १०८ व १०९]

**व्यवसाय समाधान :**

व्यक्ती करीत असलेले काम व तेथील एकुण परिरिथतीबदल आनंद व समाधान वाटत असेल तर व्यक्ती समाधानी आहे असे आपण म्हणतो. शिक्षकाचे व्यवसाय समाधान हे अनेक घटकांवर अवलंबून आहे. साधारणपणे शिक्षकाचे व्यवसाय समाधान, मुख्याध्यापक व इतर सहकाऱ्यांशी असणारा संबंध, पगार, बढतीच्या संधी, कामाचे स्वरूप, संस्थेचे सहकार्य व समस्या सोडविण्याची पद्धती यावर अवलंबून असते.

Sinha opines Job satisfaction covers both the satis faction derived from being engaged in piece of work oringary pursuit of higher order. it is essentially related to human needs and their fulfillment through work. in fact job satisfaction is generated by individual perception of how well has job on the whole is satisfying to his various nceds. [Asha Hinger, १९८६, P.No. २९]

Blum and Naylor (१९६८). The term job satisfaction have been given different connotations. Their view that job satisfaction is the result of the various attitude possessed by an employee. These attitude are related to the job and concered with such specific factors as wages, supervision, stadingess of

employment, recognition of abitity, social relation on the job and fair treatment. [Asha Hinger, १९८६, P.No. २९]

शिक्षकाचे व्यवसाय समाधान म्हणजे त्याच्या चेहऱ्यावर दिराणारा काम करतानाचा आनंद होय. ताणरहित काम करणे तसेच आपली शक्ती चांगले काम करण्यासाठी वापरणे होय. व्यवसाय समाधन मिळणे हे अनेक घटकांचे एकत्रित परिणामाचे फलित होय. ते सर्व घटक एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. पण त्या घटकांचे दोन गटात वर्गीकरण करता येते. ते खालीलप्रमाणे.........

१. वैयक्तिक घटक

२. व्यवसाय संबंधित घटक

वैयक्तिक घटकात लिंग, वय, शिक्षण बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व हे घटक येतात. तर व्यवसायासंबंधीच्या घटकात कामाचे स्वरूप व्यवसाय दर्जा, सुरक्षितता, पगार व बढतीच्या संधी हे घटक येतात.

1132 **राजमिनाक्षी, १९८८ "शारीरिक शिक्षक अध्यापक महाविद्यालया परिणामकारक घटकांचा अभ्यास" [M.B. Buch, 1977]**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. बी.एड्. ट्रेनिंग मधील परिणामकारक घटक शोधणे.

२. त्यासाठी योग्य साधन सामुग्रीचा वापर करणे.

यासाठी तामीळनाडू मधील ६१० महाविद्यालयातील १५०० विद्यार्थ्यांचा अभ्यास केला.

**निष्कर्ष :**

१. विद्यार्थ्यांमध्ये परिणामकारकता चांगली दिसून आली.

२. सुक्ष्मअध्यापन आणि प्रात्यक्षिक शिक्षकांच्या अध्यपनात परिणामामध्ये वाढ करते.

३. स्त्री शिक्षकांमध्ये अधिक परिणामकारक क्षमता दिसून आली.

**623 LAVINGIA K.U. "शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास" [M.B. Buch, Second Survey of Research in Education., Page No 438]**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. शिक्षकामधील व्यवसाय समाधानाचे मापन करणे.

२. व्यवसाय समाधानाचा शिक्षकाच्या स्थैर्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**परिकल्पना :**

१. स्त्री शिक्षिका या पुरूष शिक्षका पेक्षा जास्त समाधानी असतात.

२. व्यवसाय समाधान आणि शिक्षकांचे स्थैर्य यांचा एकमेकांशी संबंध असतो.

**नमुना निवड :**

संशोधनासाठी गुजरात राज्यातील १६०० प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवड केली. त्यांच्या पदनिश्चियन श्रेणीचा वापर करून माहिती गोळा केली. चाचणीच्या विश्वसनियतेसाठी पुनरकसोटी देऊन खात्री करून घेतली.

**निष्कर्ष :**

१. प्राथमिक शिक्षक हे माध्यमिक शिक्षकापेक्षा जास्त समाधानी होते.

२. स्त्री शिक्षिका पुरूष शिक्षकापेक्षा जास्त समाधानी होत्या.

३. कामची कार्यक्षमता आणि व्यवसाय समाधान यांचा धन सहसंबंध होता.

४. प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही गटातील तरूण शिक्षक (वय २०-२४) हे जास्त समाधानी होते.

५. अविवाहित शिक्षक जास्त समाधानी होते.

**१२. 1435 अत्रे जयशंकर "पदवी महाविद्यालयातील शिक्षकांची नितीमुल्ये आणि व्यवसाय समाधान "**

**[M.B. Buch, 1977]** त्यांच्या संशोधनाचा मुख्य हेतु असा होता की, नितीमुल्ये आणि व्यवसाय समाधनकारकता उच्च, मध्यम आणि खालच्या पातळीवर तपासणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अध्यापकामधील उच्चत्म, मध्यम व न्यूनतम् (खालच्या पातळीवरील) शिकविण्याचा परिणाम.

२. त्यांच्या मधील संबंधांची सांगड घालणे.

३. आध्यापकांचा प्रभावाचे प्रकार, मूल्यांकन, नैतिक व व्यवसाय समाधानाला पडताळणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधनासाठी त्यांनी मीरज विद्यापीठातील ११ महाविद्यालयातील ६०० विद्यार्थ्यांची निवड केली. वरील निवड यादृच्छिक (Rondom) पद्धतीनुसार केली. यासाठी अध्यापकांची व्यवसाय समाधानकारकता (कुमार ब्रे माथुर) प्रश्नावलीचा वापर केला.

**निष्कर्ष :**

१. व्यवसाय समाधानकारकता ही अध्यापनाच्या परिणाकारकतेवर अवलंबून असते.

२. अध्यापनातील परिणामकारकता साधारणपणे विस्थापीत घटक आहे.

३. व्यवसाय समाधानकारक, परिणामकारक आणि अपरिणामकारक अध्यापकांमध्ये फरक आढळून आला.

**Third Survey of Research in Education (1978-1983)**

**1159 गुप्ता एस.पी. "अध्यापनातील तिन्ही स्तरावरील व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे" (पीएच.डी. शिक्षक, १९८०) [M.B. Buch, 1978-83, Page No 809,810]**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचे मापन करणे.

२. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांनी प्रदर्शित केलेले व्यवसाय समाधान व निवडलेली मानसशास्त्रीय चले यांचा संबंध शोधणे.

३. विवाहित व अविवाहित शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाची तुलना करणे.

४. वयोगटातील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाची तुलना करणे.

५. अनुभवानुसार वेगवेगळ्या गट असणाऱ्या शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

६. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांचे व्यवसाय समाधान व काम यांचे गुणाकार प्रतिगमन समीकरणाचे भाकित करणे.

७. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यवसाय समाधानांची तुलना करणे.

**संशोधन पद्धती :**

मिरत विभागातील ७६५ प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांची स्तरित यादृच्छिक नमुना पद्धतीने निवड केली.

तिन्ही स्तरावरील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने व्यवसाय समाधान चाचणी, अध्यापनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन चाचणी, मिनाक्षी व्यक्तिमत्व शोधिका, व्यक्तिमत्व पक्वता कसोटी, वैयक्तिक माहिती नमुना याद्वारे माहिती गोळा केली आहे.

**निष्कर्ष :**

१. प्राविण्य संपादनेची गरज, भावनिक गरज आणि सहनशीलता यांचा धन सहसंबंध आला. स्वयत्तता, प्रबल, कुरापत काढणारा शिक्षक या प्राथमिक शिक्षकांचा व्यवसाय समाधानाशी ऋण संबंध होता. प्रदर्शित करण्याची गरज, अडीअडचणीत मदत करणे, मानखंडता, संवर्धन करणे अशा प्राथमिक शिक्षकांचा व्यवसाय समाधानाशी कोणताही संबंध दिसून आला नाही.

२. अध्यापनाकडे करिअर म्हणून बघणाऱ्या प्राथमिक शिक्षकांचा व्यवसाय समाधानाशी धन संबंध दिसून आला.

३. वैवाहिक स्थैर्य, वय आणि अध्यापन अनुभव यांचा व्यवसाय समाधानाशी काहीही संबंध नव्हता.

४. एकूण १२ चलांपैकी  चले प्राथमिक शिक्षकांचे व्यवसाय समाधान कमी करण्यात सहभाग घेतात. अभिवृत्ती, स्वायत्तेची गरज, प्राविण्याच्या गरजा, भावनिक गरज, व्यक्तिमत्व पक्वता, प्रदर्शित करण्याची गरज, सहनशीलता, अडीअडचणीत मदत करण्याची गरज.

५. माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा व प्राविण्य संपादनेचा धन सहसंबंध होता. प्रदर्शन, स्वायताता, पालन पोषण यांचा व्यवसाय समाधानाशी ऋण संबंध होता.

६. माध्यमिक शिक्षकांचा अध्यापनाकडे एक करिअर म्हणून पाहण्याचा दृष्टिकोण आणि व्यक्तिमत्व पक्वता यांचा धन रांबंध होता.

७. माध्यमिक शिक्षकांचे व्यवसाय समाधानाचे वैवाहिक स्थैर्य, वय आणि अध्यापन अनुभव यांचे सामाजिक दृष्टिने महत्व नाही.

८. माध्यमिक शिक्षकांचे व्यवसाय समाधान कमी करण्यास एकूण १२ चलांपैकी ८ चले सहभागी होतात. ती चले कृती, प्राविण्याची गरज, स्वयत्तेची गरज, व्यक्तिमत्व पक्वता, मानहानी, हरकत भागविणे, अडीअडचणीत मदत करणे.

९. महाविद्यालयीन शिक्षकात प्राविण्य संवादनेची गरज व मानहानी यांचा धन संबंध दिसून आला. सहनशीलता, कुरापत काढणे यांचा व्यवसाय समाधानाशी ऋण संबंध दिसून आला.

१०. महाविद्यालयीन शिक्षकात अध्यापनाकडे करिअर म्हणून पाहणे व व्यक्तिमत्व पक्वता यांचा धन संबंध येतो.

**623 LAVINGIA K.U. "शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास" [M.B. Buch, Second Survey of Research in Education., Page No 438]**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. शिक्षकामधील व्यवसाय समाधानाचे मापन करणे.

२. व्यवसाय समाधानाचा शिक्षकाच्या स्थैर्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**परिकल्पना :**

१. स्त्री शिक्षिका या पुरूष शिक्षका पेक्षा जास्त समाधानी असतात.

२. व्यवसाय समाधान आणि शिक्षकांचे स्थैर्य यांचा एकमेकांशी संबंध असतो.

**नमुना निवड :**

संशोधनासाठी गुजरात राज्यातील १६०० प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची निवड केली. त्यांच्या पदनिश्चियन श्रेणीचा वापर करून माहिती गोळा केली. चाचणीच्या विश्वसनियतेसाठी पुनरकसोटी देऊन खात्री करून घेतली.

**निष्कर्ष :**

१. प्राथमिक शिक्षक हे माध्यमिक शिक्षकापेक्षा जास्त समाधानी होते.

२. स्त्री शिक्षिका पुरूष शिक्षकापेक्षा जास्त समाधानी होत्या.

३. कामची कार्यक्षमता आणि व्यवसाय समाधान यांचा धन सहसंबंध होता.

४. प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही गटातील तरूण शिक्षक (वय २०-२४) हे जास्त समाधानी होते.

५. अविवाहित शिक्षक जास्त समाधानी होते.

## १.७ संशोधन पद्धती व साधने :

सशोधन समस्येची निश्चिती केल्यानंतर कोणत्या पद्धतीनुसार संशोधन केले आहे. याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. संशोधकाला आपल्या समस्येसंदर्भात वेगवेगळी माहिती गोळा करावी लागते. संशोधनाची माहिती गोळा करण्याच्या अनेक पद्धती आहेत. संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊनच संशोधन पद्धतीची निवड करावी लागते.

संशोधन पद्धतीचे वर्गीकरण तीन पद्धतीत करता येते ते खालील प्रमाणे.....

१. ऐतिहासिक संशोधन पद्धती

२. प्रायोगिक संशोधन पद्धती

३. सर्वेक्षण / वर्णनात्मक संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी संशोधकाने वरील पैकी सर्वेक्षण संशोधन पद्धतीची निवड केलेली आहे.

**संशोधन साधनाची निवड :**

संशोधन साधनाची निवड करताना संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन पद्धती, व्याप्ती व मर्यादा यांचा विचार करून समस्येला व उद्दिष्टांला अनुसरून संशोधकेने **मानसशास्त्रीय चाचणी (प्रश्नावली)** शिक्षकांची व्यवसाय समाधान चाचणी (Dr. Pramod Kumar and Dr.D.N. Mutha) यांची वापरली आहे.

**शिक्षक प्रश्नावली :**

शिक्षक प्रश्नावली संशोधकाने स्वत: तयार करून पाच तज्ञांकडून तपासून घेतलेली आहे. प्रश्नावलीत एकूण २९ प्रश्न आहेत. त्याची उत्तरे होय / नाही या स्वरूपात आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक (१) गुण आहे. एकूण २९ गुणांची प्रश्नावली आहे. या प्रश्नावलीत असणारे प्रश्न चार घटकांवर आधारित आहेत.

१. कामाविषयीचे समाधान आणि कामाचे स्वरूप

२. पगार, स्थैर्य आणि बढतीची संधी

३. संस्थेचे नियोजन व धोरणाविषयी समाधान

४. अधिकाराविषयी समाधान

**प्रतिसादकाची निवड :**

सोलापूर विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील सर्व शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांची प्रतिसादक म्हणून निवड केली आहे. एकूण प्रतिसादकांची संख्या ६९ आहे.

**प्रश्नावलीचे वितरण व संकलन :**

संशोधकाने तयार केलेली प्रश्नावली व प्रश्नावली भरून देण्यासाठी विनंती पत्राची छपाई करून घेतली. या पत्रात संशोधनासाठी लागणारी आवश्यक माहिती कशा स्वरूपात आहे. प्रश्नावली कशी भरावी व त्या संबंधिचे थोडक्यात निवेदन व माहिती गुप्त स्वरूपात ठेवल्याची हमी दिलेली होती.

महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन खालील तारखांना प्रश्नावली भरून देण्यासाठी त्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व अधिव्याख्यात्यांना विनंती पत्र देऊन विनंती केलेली आहे.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्रतिसादक संख्या | दिल्याची दिनांक | मिळाल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर | | | |
| २ | अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | बी.पी. सुलाखे कॉमर्स महाविद्यालय, बार्शी | | | |
| ४ | भारत महाविद्यालय, जेऊर | | | |
| ५ | छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स सोलापूर | | | |
| ६ | कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी | | | |
| ७ | डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स सोलापूर | | | |
| ८ | डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज कॉमर्स सोलापूर | | | |
| ९ | डी.जी.बी. दयानंद लॉ कॉलेज सोलापूर | | | |
| १० | दिलीप कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन खांडवी | | | |
| ११ | दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा | | | |
| १२ | देशभक्त संभाजीराव गरज महाविद्यालय, मोहोळ | | | |
| १३ | ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर शंकरनगर | | | |
| १४ | हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स सोलापूर | | | |
| १५ | कै. पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मुंद्रुप | | | |
| १६ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर | | | |
| १७ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय, सोलापूर | | | |
| १८ | लोकमंगल बायो-टेक्नॉलॉजी कॉलेज वडाळा | | | |
| १९ | माऊली महाविद्यालय, वडाळा | | | |
| २० | मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे कॉलेज ऑफ एज्युकेशन अक्कलकोट | | | |
| २१ | मदनसिह मो-पाटील विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा | | | |
| २२ | प्रतापसिंह मो-पाटील महाविद्यालय करमाळा | | | |
| २३ | राजर्षि शाहू  लॉ कॉलेज बार्शी | | | |
| २४ | रयत शिक्षण संस्थेचे आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज माढा | | | |
| २५ | संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर | | | |
| २६ | शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोलापूर | | | |
| २७ | सोजर आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज बार्शी | | | |
| २८ | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी | | | |
| २९ | कै. बाबूराव पाटील कॉलेज आर्टस ॲण्ड सायन्स अनगर | | | |
| ३० | श्री. के.एन भिसे आर्टस ॲण्ड कॉमर्स, सायन्स महाविद्यालय | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कुर्डुवाडी | | | |
| ३१ | श्री. मारूतीराव महाडिक कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स मोडनिंब | | | |
| ३२ | सुशिलकुमार शिंदे शारिरीक शिक्षण महाविद्यालय सोलापूर | | | |
| ३३ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी | | | |
| ३४ | सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग | | | |
| ३५ | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | | | |
| ३६ | समीर गांधी महाविद्यालय, माळशिरस | | | |
| ३७ | संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा | | | |
| ३८ | सांगोला कॉलेज सांगोला | | | |
| ३९ | महिला महाविद्यालय, सोलापूर | | | |
| ४० | उमा महाविद्यालय, पंढरपूर | | | |
| ४१ | वसुंधरा आर्टस कॉलेज म्हाडा जुळे सोलापूर | | | |
| ४२ | व्ही.जी. शिवदारे महाविद्यालय, जुळे सोलापूर | | | |
| ४३ | विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते | | | |
| ४४ | विठ्ठलराव शिंदे आर्टस कॉलेज टेंभूर्णी | | | |
| ४५ | विज्ञान महाविद्यालय सांगोला | | | |
| ४६ | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स सोलापूर | | | |
| ४७ | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा | | | |
| ४८ | यशवंतभाऊ पाटील महाविद्याल भोसे | | | |
| ४९ | विश्वेश्वरैय्या वाणिज्य महाविद्यालय, मंगळवेढा | | | |

संशोधनात शास्त्रीय विश्लेषणाला महत्व असल्याने सांख्यिकीच्या ज्ञानाचा यात उपयोग करून घेतला आहे. सोलापूर विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते त्यामध्ये अल्प अनुभवी व अनुभवी पुरूष व स्त्री शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांच्या व्यवसाय समाधानकारकतेचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

संशोधकाला सोलापूर विद्यापीठातील सर्व महाविद्यालयातील एकूण ६७ शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांचा प्रतिसाद मिळाला आहे. त्यापैकी स्त्री शिक्षिका ६ आहेत व पुरूष शिक्षक ६१ आहेत.

## १.८ अर्थनिर्वचन : -

**१. अल्प अनुभवी स्त्री शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याती वारंवारिता सारणी :**

**कोष्टक क्र. १**

| अ. नं. | वर्गांतर (C.I) | वारंवारिता (F) |
|---|---|---|
| १. | ४-५ | १ |
| २. | २-३ | १ |
| ३. | ०-१ | ० |
| | | N = २ |

वरील वारंवारिता सारणीमध्ये दाखविल्याप्रमाणे स्त्री शारीरिक शिक्षण संचालक व आधिव्याख्याती एकूण २ आहेत. त्यामध्ये १ वर्षापर्यंत अनुभव असणाऱ्या ० स्त्री शिक्षिका आहेत. २ ते ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या १ स्त्री शिक्षिका आहे व ४ ते ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या १ स्त्री शिक्षिका आहे.

**२. अनुभवी स्त्री शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याती वारंवारिता सारणी :**

**कोष्टक क्र. २**


| अ. नं. | वर्गांतर (C.I) | वारंवारिता (F) |
|---|---|---|
| १. | २६-३० | १ |
| २. | २१-२५ | १ |
| ३. | १५-२० | ० |
| ४. | ११-१५ | १ |

| | | |
|---|---|---|
| ५. | ६-१० | १ |
| | | N = ४ |

वारंवारिता सारणीत दाखविल्याप्रमाणे एकूण अनुभवी स्त्री शिक्षिका ४ आहेत. त्यापैकी ६ ते १० वर्षात अनुभव असणाऱ्या १ स्त्री शिक्षिका आहे. ११ ते १५ वर्षापर्यंत अनुभव असणाऱ्या १ स्त्री शिक्षिका आहे. २१ ते २५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या १ स्त्री शिक्षिका आहे.

**आलेख क्र. १**

**एकूण अल्प व अनुभवी स्त्री शिक्षकांचे प्रमाण दर्शविणारा आलेख**




स्तंभालेखात दाखविल्याप्रमाणे x अक्षावर अनुभव वर्षे दर्शवितात व y अक्षावर शिक्षिकांची संख्या दाखवितात. २-३ व ४-५ अल्प अनुभवी स्त्री शिक्षिकांची संख्या ०२ आहे. व ६-१०, ११-१५, २१-२५ व २६-३० अनुभवी स्त्री शिक्षिकांची संख्या ही प्रत्येकी एक एक आहे.

३. एकूण अल्प अनुभवी व अनुभवी स्त्री शिक्षिकांची व्यवसाय समाधानकारकतेची वारंवारिता सारणी :

**कोष्टक क्र. ३**

| अ.नं. S. N. | वर्गांतर C. I. | वारंवारिता f | विचलन d' | गुणाकार fd' |
|---|---|---|---|---|
| १. | २२-२९ | ४ | २ | ८ |
| २. | १९-२१ | ० | १ | १ |
| ३. | १६-१८ | ० | ० | ० |
| ४. | १३-१५ | २ | -१ | ० |
| ५. | १०-१२ | ० | -२ | ० |
| | | N= ६ | | Σfd= ९ |

अल्प अनुभवी व अनुभवी स्त्री शिक्षिका एकूण ६ आहेत. त्यापैकी १०-१२, १६-१८ व १९-२१ पर्यंत गुण मिळविणारी एकही स्त्री शिक्षिका नाही. १३ ते १५ गुण मिळविणऱ्या २ स्त्री शिक्षिका आहेत. व २२ ते २९ गुण मिळविणाऱ्या ४ स्त्री शिक्षिका आहेत. या वरून असे दिसून येते की ७५ टक्के शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्यात्या आपल्या व्यवसायात समाधानी आहेत.

**४. अल्प अनुभवी पुरूष शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते वारंवारिता सारणी :**

**कोष्टक क्र. ४**

| अ. नं. | वर्गांतर (C.I) | वारंवारिता (F) |
|---|---|---|
| १. | ४-५ | ७ |
| २. | २-३ | १४ |
| ३. | ०-१ | १ |
| | | N = २२ |

वरील वारंवारिता सारणीमध्ये दाखविल्याप्रमाणे पुरूष शारीरिक शिक्षण संचालक व आधिव्याख्याते एकूण २२ आहेत. त्यामध्ये १ वर्षापर्यंत अनुभव असणारे १ पुरूष शिक्षक आहे. २ ते ३ वर्षाचा अनुभव असणारे १४ पुरूष शिक्षक आहेत व ४ ते ५ वर्षाचा अनुभव असणारे ७ पुरूष शिक्षक आहेत.

**५. अनुभवी पुरूष शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते वारंवारिता सारणी :**


**कोष्टक क्र. ५**

| अ. नं. | वर्गांतर (C.I) | वारंवारिता (F) |
|---|---|---|
| १. | २६-३० | १० |
| २. | २१-२५ | ८ |
| ३. | १५-२० | ६ |
| ४. | ११-१५ | ७ |
| ५. | ६-१० | ८ |
| | | N = ३९ |

वारंवारिता सारणीत दाखविल्याप्रमाणे एकूण अनुभवी पुरूष शिक्षक ३९ आहेत. त्यापैकी ६ ते १० वर्षात अनुभव असणारे ८ पुरूष, ११-१५ मध्ये ७, १५-२० मध्ये ६ शिक्षक आहेत. २१ ते २५ वर्षापर्यंत अनुभव असणारे ८ पुरूष शिक्षक आहेत. तर २६ ते ३ वर्षाचा अनुभव असणारे १० पुरूष शिक्षक आहेत.

आलेख क्र. २

**एकूण अल्प व अनुभवी पुरूष शिक्षकांचे प्रमाण दर्शविणारा आलेख**




स्तंभालेखात दाखविल्याप्रमाणे x अक्षावर अनुभव वर्षे दर्शवितात व y अक्षावर शिक्षकांची संख्या दाखवितात. २-३ अल्प अनुभवी पुरूष शिक्षकांची संख्या १४ आहे. व ४-५ अल्प अनुभवी पुरूष शिक्षकांची संख्या ०७ आहे. तर ६-१० मध्ये ८ अनुभवी शिक्षक, ११-१५ मध्ये अनुभवी ७ शिक्षक, २१-२५ मध्ये ८ अनुभवी व २६-३० मध्ये १० अनुभवी पुरूष शिक्षकांची संख्या आहे.

६. एकूण अल्प अनुभवी व अनुभवी पुरूष शिक्षकांचे व्यवसाय समाधानकारकतेची वारंवारिता सारणी :

**कोष्टक क्र. ६**

| अ.नं. S. N. | वर्गांतर C. I. | वारंवारिता f | विचलन d' | गुणाकार fd' |
|---|---|---|---|---|
| १. | २२-२९ | ५४ | २ | १८६ |
| २. | १९-२१ | २ | १ | २ |
| ३. | १६-१८ | २ | ० | ० |
| ४. | १३-१५ | २ | -१ | ० |
| ५. | १०-१२ | १ | -२ | ० |
| | | N= ६१ | | Σfd= १८८ |

अल्प अनुभवी व अनुभवी पुरूष शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते एकूण ६१ आहेत. त्यापैकी १०-१२ गुण मिळविणारे शिक्षक १ आहेत, १३-१५, १६-१८ व १९-२१ पर्यंत गुण मिळविणारे प्रत्येकी ०२ शिक्षक आहेत. आणि २२ ते २९ गुण मिळविणारे ५४ पुरूष शिक्षक आहेत. या वरून असे दिसून येते की ९२ टक्के शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते आपल्या व्यवसायात समाधानी आहेत.

# संदर्भ ग्रंथ सूची


१. डॉ. करंदीकर सुरेश.

**<u>शैक्षणिक मानसशास्त्र</u>** (कोल्हापूर : फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९३, पृ.क्र.३३२ ते ३३७, ४१९)

२. कुलकर्णी के. वि.

**<u>सुबोध शैक्षणिक मानसशास्त्र</u>** (पुणे : श्री. विद्या प्रकाशन, तृतियावृत्ती १९८५, पृ.क्र. ४३५)

३. डॉ. जगताप ह. ना.

**<u>शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र</u>** (पुणे : नुतन प्रकाशन, प्रथमावृत्ती १९८८ पृ.क्र. ३९६)

४. जोशी स्नेहप्रभा व आंबेकर नी. शं.

**<u>आधुकि भारतीय शिक्षण</u>** (पुणे : सुविचार प्रकाशन मंडळ, प्रथमावृत्ती १९९४)

५. दांडेकर वा.ना.

**<u>शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र</u>** (पुणे : श्री. विद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९४, पृ.क्र. ४०९)

६. नानकर प्रभाकर.

**<u>सुबोध शैक्षणिक मानसशास्त्</u>** (पुणे : नूतन प्रकाशन १९९२ पृष्ठ क्र. २५३)

७. पाटील लिला व कुलकर्णी विश्वंभर.

**<u>आजचे शिक्षण आजच्या समस्या</u>** (पुणे : श्री विद्या प्रकाशन, द्वितीयावृत्ती १९७४)

८. बापट भा.गो.

**<u>शैक्षणिक संशोधन</u>** (पुणे : नूतन प्रकाशन, तृतियावृत्ती, १९९८, पृष्ठ क्र. २२०)

९. भिंताडे वि. रा.

**शैक्षणिक संशोधन पध्दती** (पुणे : नूतन प्रकाशन, १९८९ पृष्ठ २२४)

१०. मस्के टी. ए.

**शैक्षणिक संख्याशास्त्र** (पुणे : प्रज्ञा प्रकाशन १९८८ पृष्ठ २१९)

११. मुळे रा. शं. उमाठे वि. तु.

**शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे** (औरंगाबाद : विद्या बुकस १९९८पृष्ठ ४०६)

१२. डॉ. वास्कर आनंद व डॉ. वास्कर पुष्पा.

**भारती शिक्षणाचे बहुजनीकरण**(पुणे :नूतन प्रकाशन, प्रथमावृत्ती,१९९८,पृ.क्र. ४१२)

१३. **शिक्षक क्षमता समृद्धी** (पुणे : सचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, द्वितीयावृत्ती १९८८)

१४. निलिमा सप्रे व प्रिती पाटील.

**शिक्षणातील विचारप्रवाह** (कोल्हापूर : फडके प्रकाशन, २००५ पृ.क्र. १८३,१८४)

१५. जाधव एम.एल., भोसले ए.व्ही व सरपोतदार पी.ए.

**माध्यमिक शिक्षण** (कोल्हापूर : फडके प्रकाशन, २००७ पृ.क्र. २१)

१६. पारसनीस न.रा.

**शिक्षकांचे प्रशिक्षण** (पुणे : नुतन प्रकाशन, २००२ पृ.क्र. ७५)

१७. नरवणे मीनल.

**भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या** (पुणे : नुतन प्रकाशन, पृ.क्र. ७८)

# नियतकालिके


१) भारतीय शिक्षण जाने. २००७

२) Research Bulletin April २००६. SCERT Pune ३०.

Journal of all Indian Association for educational research Volume १९. Jan. ०७.

A Journal of the society for educational research development perspectives in education volume २३. April ०७.

Journal of education research and EXTERN Jan. ०६.

Perspective in Eduction Vol. १२. July ०६. A Journal of Society for educational research & developement.

Website address :

http :/www.bolokids.com/२००६/००९/htm.

## REFERENCE BOOKS


1. Best J. W.

   **Research in Education.** (New Delhi, Prentice Hall of India, Pvt. Ltd. 1982). P. No. 435

2. Buch M. B. (Ed.)

   **A Survey of Research in Education.** Published by M.S. University of Baroda, First Edition 1974.

3. Buch M. B. (Ed.)

   **Second Survey of Research in Education.** Published by Society of Educational Research and Development, Baroda, First Edition 1979. P.No.614

4. Buch M. B. (Ed.)

   **Third Survey of Research in Education.**

   Published by New Delhi, NCERT, 1987 P.No. 797, 1148

5. Buch M. B. (Ed.)

   **Fourth Survey of Research in Education.**

   Vol. I & II New Delhi : National council of educational research and training 1991. P. No. 652, 956, 985.

6. Buch M. B. (Ed.)

   **I and II Survey of Research in Education.**

   Published by New Delhi, NCERT, 1987 P.No.

7. Buch M. B. (Ed.)

   **Fifth Survey of Research in Education.**

   National Council of Educational Research and Training 1991. P.No. 1435, 1471

8. Hinger Asha.

**Leadership Styles and Job Satisfaction** Jaipur : Printwell Publishers 1986. P.No. 272

9. Jangira N.K. and Jangira Pinki

**Effective Teaching** New Delhi. National Publishing house, first Edition 1995. P.No. 102

10. Singh R.S.

**Teacher's Effectiveness in India** Allahabad : Chugh Publications

12. Khan M. S.

**Educational Research.** New Delhi : Ashish Publishing house 1990.

13. Dr. Pramodkumar. Mutha D.N

**Revised Manual Job Satisfaction Questionnaire** Department of Psychology, Sardar Patel University Vallabh Vidyanagar 1985. P.No. 8

# परिशिष्ट क

## शिक्षकाचे व्यवसाय समाधान चाचणी

| | | |
|---|---|---|
| ०१. | आपला स्वभाव अध्यापनास उपयुक्त आहे असे वाटते का ? | होय / नाही |
| ०२. | अध्यापन अनुभवामुळे आपणास आनंद मिळतो का ? | होय / नाही |
| ०३. | आपल्याला आपल्या व्यवसायाबद्दल अभिमान आहे का ? | होय / नाही |
| ०४. | अध्यापन हा एक अदर्श व्यवसाय आहे असे आपल्याला वाटते का ? | होय / नाही |
| ०५. | आपण अध्यापन व्यवसाय मिळाल्याने स्वत:ला भाग्यशाली समाजता काय | होय / नाही |
| ०६. | जर आपणाला संधी मिळाली तर आपण आहे त्या वेतनावर इतर व्यवसायात जाणे पंसत कराल काय ? | होय / नाही |
| ०७. | आपण केलेल्या चांगल्या कामाचे फळ संस्थेकडून मिळते असे आपल्यालाय वाटते काय ? | होय / नाही |
| ०८. | आपल्या कामाला अनुसरून योग्य वेतन मिळते असे आपल्याला वाटते काय ? | होय / नाही |
| ०९. | आपण आपल्या व्यवसायामध्ये मिळणाऱ्या बढतीच्या संधीबद्द्ल समाधानी आहात काय ? | होय / नाही |
| १०. | आपण आपल्या व्यवसायामध्ये उत्पन्न वाढविण्याच्या संधीबद्दल समाधानी आहात काय ? | होय / नाही |
| ११. | योग्यवेळी आपली पदोन्नती होईल याबद्दल आपण निश्चित आहात काय | होय / नाही |
| १२. | आपल्या संस्थेत पदोन्नती योग्यतेच्या आधारावर होते याच्याशी आपण सहमत आहात काय ? | होय / नाही |
| १३. | आपला व्यवसाय पूर्णपणे सुरक्षित आहे असे आपल्याला वाटते काय ? | होय / नाही |
| १४. | आपण सध्याच्या सेवा संबंधीच्या निमयमाबद्दल समाधानी आहात काय | होय / नाही |
| १५. | आपली संस्था शिक्षकाभिमुख आहे असे आपल्याला वाटते काय ? | होय / नाही |
| १६. | संस्थेच्या कामकाजाविषयी सल्ला देण्याची संधी तुम्हाला दिली जाते काय ? | होय / नाही |

१७. आपण संस्थेच्या योजना आणि धोरणाबद्दल असहमती दर्शविण्यासाठी स्वतंत्र आहात काय ? होय / नाही

१८. आपण संस्थेच्या सर्वसाधारण कामकाजाविषयी समाधानी आहात काय होय / नाही

१९. आपल्या संस्थेत शैक्षणिक / व्यावसायिक योग्यता वाढविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या संधीबद्दल समाधानी आहात काय ? होय / नाही

२०. आपली संस्था अध्यापनासाठी उपयुक्त ठिकाण आहे असे आपल्याला वाटते काय ? होय / नाही

२१. आपल्या संस्थेचा आपल्याला अभिमान वाटतो का ? होय / नाही

२२. आपल्या संस्थेचे प्रमुख निपक्ष:पाती व्यक्ती आहे असे आपल्याला वाटते काय ? होय / नाही

२३. आपल्या संस्थेचे प्रमुख त्या पदासाठी योग्य आहेत असे आपल्याला वाटते काय ? होय / नाही

२४. तुमच्या संस्थेचे अध्यक्ष आपल्या भल्यासाठी प्रयत्नशील असताता असे वाटते काय ? होय / नाही

२५. आपण केलेल्या चागंल्या कामाबद्दल संस्थेचे प्रमुख प्रशंसा करतात असे आपल्याला वाटते काय ? होय / नाही

२६. संस्था अध्यक्षांच्या संस्था चालविण्याच्या कार्याबद्द्ल आपण समाधानी आहात काय ? होय / नाही

२७. आपले संस्थाध्यक्ष एक ‘अधिकारी’ म्हणून आपण समाधानी आहात काय ? होय / नाही

२८. संस्थेद्वारा शिक्षकांच्या अडचणी सोडविण्याच्या पद्धतीविषयी आपण समाधानी आहात काय ? होय / नाही

२९. आपल्या संस्थेत आपली गळचेपी होते असे आपल्याला वाटते काय ? होय / नाही

# परिशिष्ट फ

## चाचणी भरून देण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक व अधिव्याख्याते यांना दिलेले विनंती पत्र

प्रा. वाधमोडे ए.पी,
शंकरराव मोहिते महाविद्यालय,
अकलूज
दिनांक / /२००

प्रति,
मा. श्री./श्रीमती
______________________________
______________________________
______________________________

महोदय/महोदया,

ठिकाण :- अकलूज

आपल विश्वासू.

दिनांक :- / /२००

# परिशिष्ट फ

## चाचणी भरून घेण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिलेले विनंती पत्र

प्रा. वाधमोडे ए.पी,
शंकरराव मोहिते महाविद्यालय,
अकलूज
दिनांक / /२००

प्रति,
मा. श्री./श्रीमती
____________________
____________________
____________________

महोदय/महोदया,

ठिकाण :- अकलूज

आपल विश्वासू.

# परिशिष्ट फ

## सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालयांची यादी

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव व पत्ता |
|---|---|
| १ | ए.आर. बुर्ला  महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर |
| २ | अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर |
| ३ | बी.पी. सुलाखे कॉमर्स महाविद्यालय, बार्शी |
| ४ | भारत महाविद्यालय, जेऊर |
| ५ | छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स सोलापूर |
| ६ | कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी |
| ७ | डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स सोलापूर |
| ८ | डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज कॉमर्स सोलापूर |
| ९ | डी.जी.बी. दयानंद लॉ कॉलेज सोलापूर |
| १० | दिलीप कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन खांडवी |
| ११ | दलित मित्र कदम गुरूजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा |
| १२ | देशभक्त संभाजीराव गरज महाविद्यालय, मोहोळ |
| १३ | ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर शंकरनगर |
| १४ | हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स सोलापूर |
| १५ | कै. पाटील आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज मुंद्रुप |
| १६ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर |
| १७ | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय, सोलापूर |
| १८ | लोकमंगल बायो-टेक्नॉलॉजी कॉलेज वडाळा |
| १९ | माऊली महाविद्यालय, वडाळा |
| २० | मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे कॉलेज ऑफ एज्युकेशन अक्कलकोट |
| २१ | मदनसिह मो-पाटील विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा |
| २२ | प्रतापसिंह मो-पाटील महाविद्यालय करमाळा |
| २३ | राजर्षि शाहू  लॉ कॉलेज बार्शी |
| २४ | रयत शिक्षण संस्थेचे आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज माढा |
| २५ | संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर |

| | |
|---|---|
| २६ | शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोलापूर |
| २७ | सोजर आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज बार्शी |
| २८ | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| २९ | कै. बाबूराव पाटील कॉलेज आर्टस ॲण्ड सायन्स अनगर |
| ३० | श्री. के.एन भिसे आर्टस ॲण्ड कॉमर्स, सायन्स महाविद्यालय कुर्डुवाडी |
| ३१ | श्री. मारूतीराव महाडिक कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स मोडनिंब |
| ३२ | सुशिलकुमार शिंदे शारिरीक शिक्षण महाविद्यालय सोलापूर |
| ३३ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी |
| ३४ | सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग |
| ३५ | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज |
| ३६ | समीर गांधी महाविद्यालय, माळशिरस |
| ३७ | संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा |
| ३८ | सांगोला कॉलेज सांगोला |
| ३९ | महिला महाविद्यालय, सोलापूर |
| ४० | उमा महाविद्यालय, पंढरपूर |
| ४१ | वसुंधरा आर्टस कॉलेज म्हाडा जुळे सोलापूर |
| ४२ | व्ही.जी. शिवदारे महाविद्यालय, जुळे सोलापूर |
| ४३ | विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते |
| ४४ | विठ्ठलराव शिंदे आर्टस कॉलेज टेंभूर्णी |
| ४५ | विज्ञान महाविद्यालय सांगोला |
| ४६ | वालचंद कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स सोलापूर |
| ४७ | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा |
| ४८ | यशवंतभाऊ पाटील महाविद्याल भोसे |
| ४९ | विश्वेश्वरैय्या वाणिज्य महाविद्यालय, मंगळवेढा |

# परिशिष्ट च

## प्रतिसादकांची यादी व गुण

| अ.क्र | नाव | आुभव (वर्षे) | गुण |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रणनवरे विक्रम | ७ | २८ |
| २ | प्रा. गाजरे शाम | २९ | २६ |
| ३ | *प्रा. दळवी रजनी | २८ | २९ |
| ४ | प्रा. गवळी संतोष | २४ | २० |
| ५ | प्रा. झाडबुके जे.पी. | २९ | २८ |
| ६ | प्रा. लांडगे सुरेश | २८ | २७ |
| ७ | प्रा. मोहिते डी.एम. | ३१ | २७ |
| ८ | प्रा. मुनसी ए.आर. | २७ | २९ |
| ९ | प्रा. पवार आर.ए. | ३५ | २६ |
| १० | प्रा. तोरवी एस.सी. | १० | २७ |
| ११ | प्रा. चौगुले किरण | ११ | २९ |
| १२ | प्रा. चव्हाण आनंद | ११ | २८ |
| १३ | प्रा. मनुकर समर्थ | ११ | २८ |
| १४ | प्रा. लकाडे ए.टी. | ३ | २२ |
| १५ | प्रा. बिराजदार डी.एम. | ५ | २७ |
| १६ | प्रा. सोहानी एन.जी. | २२ | २७ |
| १७ | प्रा. पांचाभाई व्ही.बी. | ४ | २८ |
| १८ | प्रा. देशमुख डी.के. | २० | २६ |
| १९ | प्रा. देशपांडे ए.के. | २४ | २८ |
| २० | प्रा. धुपे एस.के. | ३२ | २८ |
| २१ | प्रा. गोडसे एस.ए. | ३३ | २९ |
| २२ | प्रा. मोलाो बी.एस. | ५ | २७ |
| २३ | प्रा. मोरे एस.व्ही. | २३ | २७ |
| २४ | प्रा. देशपांडे दिोश | ३ | २७ |
| २५ | *प्रा. भिले भाग्यश्री. | ४ | २८ |
| २६ | प्रा. कांबळे ए.एन. | ३ | २७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | प्रा. देशमुख एम.व्ही. | २ | २८ |
| २८ | प्रा. शेटे जगदीश | २ | २६ |
| २९ | प्रा. मोहिते बी.सी. | ९ | २८ |
| ३० | प्रा. गोरे मिलिंद | १ | २९ |
| ३१ | प्रा. वांगी एस.एस. | ३ | २८ |
| ३२ | प्रा. साबळे के.के. | २ | २८ |
| ३३ | प्रा. मेटकरी यु.व्ही. | २ | २९ |
| ३४ | *प्रा. हरकरे जी.एम. | १२ | १५ |
| ३५ | प्रा. मस्के एस.पी. | ४ | २९ |
| ३६ | प्रा. शेख एम.के. | ९ | २९ |
| ३७ | प्रा. कु नळे रवी | १५ | २५ |
| ३८ | प्रा. वाघचैव्हरे बी.डी. | ९ | २९ |
| ३९ | प्रा. पाटील एम.बी. | ११ | २८ |
| ४० | प्रा. गायकवाड डी.एस | १० | २८ |
| ४१ | प्रा. चोककर्रे के.टी., | १२ | २७ |
| ४२ | प्रा. पाटील ए.बी. | १७ | २९ |
| ४३ | *प्रा. मुंढे व्ही.एस. | २५ | २९ |
| ४४ | प्रा. कटपे एम.डी. | २ | २८ |
| ४५ | प्रा. पवार व्ही.एम. | १७ | २९ |
| ४६ | प्रा. नवले डी.व्ही. | २ | २९ |
| ४७ | प्रा. काटे एल.एम. | २ | २९ |
| ४८ | प्रा. लवटे एस.एस. | ५ | २९ |
| ४९ | प्रा. माने ए.आर. | २ | १८ |
| ५० | प्रा. गोडवे एस.डी. | २२ | २८ |
| ५१ | प्रा. बारसकर एच.के. | १२ | २२ |
| ५२ | प्रा. तांबिले पी.आर. | १० | २३ |
| ५३ | प्रा. भुजबळ एम.ए. | १० | २८ |
| ५४ | प्रा. झर्डे ए.एस. | २ | १५ |
| ५५ | प्रा. वाघमोडे | २ | २१ |
| ५६ | प्रा. गवळी आर.एल. | ३२ | २७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७ | प्रा. आजरी रमेश | २३ | १२ |
| ५८ | प्रा. झाडबुके सुलि | २० | २७ |
| ५९ | प्रा. गुंड भारत | १७ | २९ |
| ६० | *प्रा. सुरवसे डिंपल | ९ | २३ |
| ६१ | प्रा. मारकड सुभाष | २१ | २९ |
| ६२ | प्रा. नागटिळक रामहारी | ४ | २८ |
| ६३ | प्रा. निंबाळकर आंद | ५ | १४ |
| ६४ | प्रा. फडतरे जी.एस. | ३५ | २५ |
| ६५ | प्रा. भोसले एस.आर. | २२ | १६ |
| ६६ | प्रा. कोकाटे डी.ए. | १६ | २९ |
| ६७ | *प्रा. मिसाळ ए.एन. | ३ | १५ |